# राशिभविष्य - नोव्हेंबर, २०१३

दादा दामले(dadadamle@gmail.com)

==================================================

सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा!

==================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागते. रवि ग्रह शारीरिक आरोग्याचे दृष्टीने प्रतिकुल होणार असून दांपत्य जीवनातील सुखातही बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. काही मंडळीना पोटविकाराचा तर काहींना मूत्राशयविकाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. जीवनसाथीशी मतभेद, भांडणे होण्याची शक्यता आहे. जपा. शासकीय, निमशासकीय नोकरदार मंडळींना वरिष्ठांच्या विरोधाचा त्रास सहन करावा लागेल. वाम मार्ग धन सहज मिळणे सहज शक्य असले तरी तो मोह टाळाच. वाईट मार्गाने प्रसिद्धी मिळू शकेल. कुसंगतीचा धोकाही संभवतो. त्यामुळे आर्थिक नुकसान होणे शक्य आहे. जपा. मंगळाच्या प्रतिकुलतेमुळे संततिसुखातही बाधा येणे शक्य आहे. मुलांचे अनारोग्य किंवा अविचारी आचरण यांमुळे त्रस्त व्हाल. यामुळे काही मंडळींच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात चोरी किंवा अपप्रचाराचा त्रास होणे संभवते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह या राशीच्या व्ययस्थानी असल्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे, सांपत्तिक अडचणी येणे शक्य आहे. जपा. अशा प्रतिकुल परिस्थितीत गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना सुख, ऐषाराम, थोरकृपा, प्रसिद्धी मिळू शकेल. या राशीच्या साहित्यिकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. श्रीगजाननाची उपासना मन शांत व स्थिर ठेवू शकेल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव या महिन्याच्या काळात अतिशय लहरी व विक्षिप्त होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार आहे. त्यामुळे जे काही साधावयाचे ते त्यांनी पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. नंतर अस्थिर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. ज्या मंडळींचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे त्यांना अशा संबंधामुळे लाभ होणे संभवते. मानसोपचार तज्न्य व द्रव पदर्थांचे व्यापारी यांना या महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. शनि-मंगळाच्या

प्रतिकुलतेमुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. तसेच गृहसौख्यात बाधा येऊ शकेल. काही मंडळींना राहत्या जागेची समस्या तर काहींना स्थावरसंबंधीची समस्या त्रस्त करील. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात एखादी संततिसमस्या त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात काही मंडळींना वैवाहिक जीवनात मनस्ताप सहन करावा लागेल; तर काही मंडळींना स्वत:च्या अनारोग्याचा त्रास होणे संभवते. जपा. हर्षलमुळे मित्रांशी भांडणे होण्याची शक्यता आहे. तसेच जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत अस्थिरता निर्माण होणे संभवते. अशा परिस्थितीत गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. व्यापार-व्यवसायात प्रगती व अर्थलाभ होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शुक्रामुळे काही मंडळींना प्रतिष्ठा तर काहींना भूमिलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर कुलदेवतेची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात कसला तरी त्रास सतावेल. या राशीच्या  व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या मंडळींनी कुसंगतीपासून दूर राहावे. नपेक्षा नुकसान व मनस्ताप सहन करावा लागेल. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात वरिष्ठांशी वाद, मतभेद होणे संभवते. मुलांपैकी कोणाच्या अनारोग्यामुळे थोडी चिंता निर्माण होणे संभवते. तसेच मुलांपैकी कोणाच्या त्रासदायक आचरणाचा त्रासही होणे संभवते. अपघात भय, नातेवाईकांशी दुरावा निर्माण होणेही शक्य आहे. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी जपावे. दलाली, कमिशनवर व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. मंगळाच्या अनुकुलतेमुळे धैर्य, हिंमत, महत्वाकांक्षा, कर्तबगारी वाढेल. प्रवासाचे योग येतील. यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, औषधविक्रेते, वैद्यकीय व्यवसाय असणारांना काळ, अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. चिकित्सक बौद्धिक क्षेत्रात कार्यरत असणारांना, तसेच राजकारणात कार्यरत असणारांनाही काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. गुरु-नेपच्यून शुभ योगामुळे अध्यात्मात रस असणाऱ्या मंडळींना उपासनेद्वारे सात्विक सुखशांती लाभेल. काहींना सूचक स्वप्ने पडतील तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे आरोग्य उत्तम राहील. श्रद्धा असेल तर नियमितपणे बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना कौटुंबिक सुख व गृहसौख्य या दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. रवि-मंगळ हे दोन्ही महत्त्वाचे ग्रह प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी मन व बुद्धीवर नियंत्रण ठेवून, जिभेला लगाम घालून व सहनशील बनून आचरण केल्यासच प्रतिकुल काळ कमी मनस्तापाने व्यतीत करणे सहज शक्य होईल. धनस्थानी असलेल्या मंगळामुळे काही मंडळींना अनपेक्षित येऊन पडणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्यांना तोंड द्यावे लागेल. काही मंडळींना अपेक्षित अर्थप्राप्ती होण्यासाठी अधिक धडपड करावी लागेल. देणे द्यावे लागेल; पण येणे वसूल होणे कठिण होईल. मनस्तापामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकार बळावतील. घसा, मान, दाढा यांचे आजार, डोळ्याचे आजार होणे संभवते. काहींना इजा होणेही शक्य दिसते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात परिस्थिती सुधारेल व धैर्य येऊन हिंमत वाढेल. काही मंडळींची महत्त्वाकांक्षा उचंबळून येईल व हातून एखादी कर्तबगारी पार पडेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी रवि-शनि-राहूसारखे प्रतिकुल ग्रह असल्यामुळे विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक त्रास, अकारण खर्च, नियोजित कार्यात होणारी दिरंगाई, त्यामुळे होणारे अनारोग्य, स्थावरसंबंधी वाद यांमुळे गृहसौख्य लाभणे अशक्य होईल. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी नेपच्यून असल्याने ज्यांची नोकरी पाण्याशी संबंधित आहे अशांनी पाण्यापासून होणाऱ्या अपघातापासून जपावे. सर्वांना विषभयही आहेच. हर्षलमुळे काहींना परदेशगमनाचे योग येतील. तसेच शास्त्रीय संशोधन कार्यात प्रगती होईल.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींचे आचरण या महिन्याच्या काळात "वरून कीर्तन, आतून तमाशा" अशा प्रकारचे होण्याची शक्यता आहे. जपा. मंगळ ग्रह प्रतिकुल असल्यामुळे शरीरपीडा, कष्ट, दगदग होऊन अनारोग्य होण्याची शक्यता दिसते. स्वभाव अतिशय हट्टी होईल व अकारण मानापमान फ़ार असणार आहेत. त्यातून आचरणात उद्धटपणा येऊ शकेल. नोकरीत मनाविरुद्ध घटना घडतील. त्यामुळे अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागेल. शासकीय, निम शासकीय नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असल्यामुळे त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. त्या काळात वरिष्ठही तुमच्या कामावर खूश असतील. वकिली - सल्लागारी व्यवसाय, अकौंटन्सी, चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात कार्य दिरंगाई, निराशा,

कौटुंबिक त्रास अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. या राशीच्या विवाहेच्छू वधूवरांना विवाहयोग संभवतो. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना उच्च प्रगती साधणे शक्य होईल. प्रेमसंबंध वाढतील व अर्थलाभही होईल. बाह्य जीवनात वावरताना, वाहन चालविताना, अत्यंत सावधानतेने आचरण करा. अपघातभय आहेच. श्रद्धा असेल तर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे आर्थिक समस्या, अकारण खर्च, जुन्या दबलेल्या प्रकरणांचा त्रास, गैरसमजुती, मानहानी, भांडणे अशापैकी कारणांनी ही मंडळी त्रस्त होतील. जपा. नोकरी-व्यवसायात स्त्रीवर्गाकडून त्रास होणे संभवते. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हट्टी व उद्धट स्वभावामुळे व मानापमान फ़ार असल्यामुळे अकारण शारीरिक श्रम, दगदग, मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. धनस्थानी असलेल्या शनिमुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात रविमुळे अनारोग्य, नेत्रपीडा, फ़सवणूक, आप्तेष्ट भांडणे, होणे शक्य आहे. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सर्वांनाच रवि अनुकुल होईल व नोकरी-व्यवसायात प्रगती, अर्थप्राप्ती, काहींना प्रसिद्धी तर काहींना उच्चपद, मानाचे स्थान असे काही मिळू शकेल. शुक्राच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या शेती व्यवसाय असणाऱ्या मंडळींना अपेक्षेपेक्षा अधिक लाभ होईल. तसेच मित्रसुख लाभून धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या काही मंडळींना उगीचच काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. हर्षलमुळे जीवनसाथीचे आचरण लहरी, विक्षिप्त असे होऊन वैवाहिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. भागीदारीत व्यवसाय असणारांनी काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. गुरुच्या अनुकुलतेने बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि, शनि, राहू व बुध हे चारही ग्रह प्रतिकुल असल्याने काही ना काही कारणाने या राशीच्या मंडळींचे आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना रक्तदाबाचा, काहींना हृदयविकाराचा, काही मंडळींना कुसंगतीचा तर काही मंडळींना एखादी चिंता त्रस्त करील. काही मंडळींना अपमानाचा असह्य

त्रास सहन करावा लागेल. काही मंडळींना मुदतीचा ताप येणे, मेंदूविकार बळावणे, काही मंडळींना नेत्रविकाराचा त्रास होईल. काहींना कुसंगतीचा त्रास होईल. मंगळामुळे कष्ट परिश्रमानेच अर्थलाभ होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात विविध प्रकारे मनस्ताप सहन करावा लागेल. या राशीच्या काही मंडळींना शुक्राच्या अनुकुलतेमुळे विविध प्रकारचे लाभ होतील. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक धनलाभ होईल. भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे सहज शक्य होईल. सद्गुणांची वाढ होईल. प्रवासाचे योग येतील. दांपत्यजीवनात सुखसमाधान लाभणे अशक्य होईल. कोर्ट प्रकरण असेल तर यश मिळण्याची शक्यता दिसत नाही. लाभस्थानी असलेल्या मंगळामुळे काही मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने  मनोनुकुल घटना घडतील. पण आग्रहाने सांगावेसे वाटते की काळ शनि ग्रहाच्या साडेसातीचा आहे. तेव्हा मन व विचारशक्ती स्थिर व शांत ठेवून व शारीरिक आरोग्याची काळजी घेऊनच आचरण करावे. मन:शांतीसाठी हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे याची सतत जाणीव ठेवूनच त्यांनी सावधानतेने व विचारपूर्वक आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. या महिन्याच्या काळातील एकूण ग्रहस्थिती या राशीच्या मंडळींना बरीचशी प्रतिकुल अशीच असल्याचा अनुभव येईल. रवि-शनि हे पितापुत्र ग्रह विविध प्रकारे मनस्तापकारक व अनारोग्यकारकच असल्याचा अनुभव येईल. अशा परिस्थितीत मन व विचारशक्तीवर ताबा ठेवून, संयम व सहनशीलतेने वागून प्रतिकुल काळ व्यतीत करणे हेच हिताचे होईल. आर्थिक व्यवहार करताना विशेष काळजी घ्या. मानहानीचे प्रसंग प्रतिक्रिया व्यक्त न करता सहन करा. तरच फ़ारसे अनारोग्य होणार नाही. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी तर मनक्षोभ होणार नाही याची विशेष काळजी घ्यावी. गैरसमजामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल. तसेच वरिष्ठांची अवकृपा सहन करावी लागेल. स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांना खळबळजनक परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. उच्च चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील व थोडा दिलासा मिळेल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग आहेत

अशापैकी काहींना अचानक धनलाभ होणेही शक्य आहे. या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना परदेशगमनाचे योगही संभवतात. हनुमान उपासना अनुकुल होईल. हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या नोकरी-व्यवसायात असणाऱ्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होणार आहे. म्हणून त्यांनी जे काय साधावयाचे ठरविले असेल ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना बढती, पगारवाढ, काहींना उच्च पद तर काहींना अधिकारपद मिळण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात मात्र परिस्थिती बदलेल व मन अस्वस्थ करणाऱ्या घटनांना तोंड द्यावे लागेल. जपा. वकिली, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना मात्र संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणांनी अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे कसल्याही परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही. अशा परिस्थितीत अध्यात्मात रस असेल तर उपासनेद्वारे मन शांत व स्थिर राहू शकेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडणे संभवते. प्रवासाचे योग येतील; पण प्रवासात त्रास होण्याची दाट शक्यता दिसते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरुमुळे नवे स्नेहसंबंध, प्रेमसंबंध जुळून येण्याची शक्यता आहे. तसेच या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील व संपन्न होतील. तसेच कमी-अधिक प्रमाणात धनलाभ होण्याची शक्यताही दिसते. आपली राशी गुरु ग्रहाच्या स्वामित्वाची आहे. म्हणून "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण अनुकुल, लाभदायक व सात्विक सुखसमाधान देऊ शकेल.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ खूपच अनुकुल असल्याचा अनुभव येईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्ध मात्र मनस्तापदायक असल्याचा अनुभव येईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात मात्र मनोनुकुल व लाभदायक घटना घडून सुखसमाधान लाभेल. वकिली, अकौंटन्सी, शिक्षण क्षेत्र, अन्य बौद्धिक व्यवसाय असणारांना, तसेच लोखंडी सामान विक्रेत्यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या धनस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक बाबतीत विचारपूर्वक कार्यवाही करावी. काही

मंडळींना कोणासाठी आर्थिक जबाबदारी घ्यावी लागेलसे दिसते. काहींच्या आर्थिक व्यवहारात घोटाळे होण्याची शक्यता जाणवते. काही मंडळींना आर्थिक समस्या त्रस्त करील. जपा. मंगळ ग्रह प्रतिकुल असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणेच अगत्याचे होईल. अपघात भय आहे. जपा. तसेच शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे आजार होणे संभवते. काही मंडळींना मूळव्याधीचा त्रास सहन करावा लागेल. हाडमोड होणेही संभवते. शारीरिक, मानसिक कष्ट परिश्रम होतील. नियोजित कार्यात अपयश येण्यामुळे निराश व्हाल. शक्यतो प्रवास टाळा. त्रास, मानहानी होणे संभवते. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. गैरसमज, कोणाशी न पटणे अशापैकी कारणांनी गृहसौख्यात थोडी बाधा येण्याची शक्यता आहे. काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. श्रद्धेने श्रीहनुमंताची उपासना करा. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. अशा परिस्थितीत या राशीच्या मंडळींचे मन सध्या अति कोमल झाले असण्याची शक्यता जाणवते. शीघ्र मानसिक संवेदना झाल्या असतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडेही काही घडले तर लगेच नैराश्य येत असावे, असे वाटते. मन व बुद्धी चंचल, अस्थिर असल्यामुळे अविचारी आचरण होणे संभवते. जपा. इतरांची मने अकारण दुखावली जाऊ नयेत म्हणून जिभेला लगाम घाला. विचारपूर्वक पण आवश्यक तेवढाच पैसा खर्च करा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. प्रेमसंबंध, स्नेहसंबंध घट्ट होतील. अपेक्षित अर्थलाभ होणेही शक्य दिसते. दूरच्या प्रवासाचे योग येतील. महिन्याच्या पूर्वार्धात मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील व त्यामुळे अस्वस्थ व्हाल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मनस्तापामुळे अनारोग्य होण्याची शक्यता आहे. उष्णताविकार बळावतील. सर्व प्रकारच्या अपघातापासून जपावे. विचाराच्या तंद्रीत चालू नये, वाहन चालवू नये. तसेच वीज, पाणी यांपासूनही धोका संभवतो. जपा. दांपत्यजीवनात जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे, दोघांतील मतभेदांमुळे, स्वाभाविक दोषांमुळे, काही कारणाने दुरावा आल्यामुळे सुखसमाधानात बाधा येणे संभवते. भागीदारीत उद्योग, व्यवसाय असणारांनी गैरसमजाने वा अन्य कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. नपेक्षा अपयश येणे संभवते.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अतिशय लहरी, चंचल व अस्थिर असा झाला असण्याची शक्यता वाटते. या राशीची लहान मुले तर अतिशय हूड व व्रात्य झाली असणेही संभवते. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी मन व बुद्धीवर ताबा ठेवूनच आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. तसेच वाहन सावधानतेनेच चालवावे. अपघात भय आहे. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या गुरुमुळे गृहसौख्य लाभेल, स्थावर खरेदीविक्री अपेक्षेप्रमाणे घडून य़ेईल. पण नातेवाईक मंडळीकडून त्रास होणे संभवते. रवि-मंगळ हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असल्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णतेच्या विकारांचा त्रास सहन करावा लागेल. अंगावर फ़ोड येणे, ताप येणे, हृदयविकार, रक्तविकार बळावणे असे आजार होणे संभवते. याशिवाय असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे, कशाचे तरी भय वाटणे, नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागणे, जीवनसाथीचे व मुलांचे आजारपण निस्तरावे लागणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात दांपत्यजीवनात मतभेद, भांडणे यांमुळे त्रस्त व्हाल. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकला. नपेक्षा अपयशाला सामोरे जाण्यास सिद्ध व्हा. या राशीच्या ज्या मंडळींना वाममार्गा धन सहज मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह टाळावाच. तेच सुखाचे होईल.

=====OOOOO=====